L06-02

जा.क्र./जिशचि/आयपीएचएस/समायोजन/ /१८
कार्यालयः जिल्हा शल्य चिकित्सक,
सर्वोपचार रुग्णालय नागपूर
दिनांक 23/09 / २०१८

आरोग्य सेवा

**विषयः-आयपीएचएस कार्यक्रमांतर्गत प्रा.आ.केंद्रातील कार्यमुक्त केलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या समायोजनाबाबत**

संदर्भः-१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपुर यांचे जा.क्र. /आयपीएचएस/जिपना/आयपीएचएस/६३६८/२०१७,दि.१/११/२०१७ अन्वये.
२) मा.आयुक्त,आरोग्य सेवा,अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई,महाराष्ट्र यांचे जा.क्र.राआसो/आयपीएचएस/कंप्रतं.समायोजन/९६७९२-९७०१४,दि.४/०१/२०१८ अन्वये.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये सन २०१७-१८ च्या मंजुरी प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये आयपीएचएस कार्यक्रमांतर्गत प्रा.आ.क्रेंद्र स्तरावरील एकुण १२ प्रयोगशाळा तंत्रज्ञांची पदे नामंजुर करण्यात आलेली असल्यामुळे सदर प्रयोगशाळा तंत्रज्ञांना दि.१/११/२०१७ रोजी कार्यमुक्त करण्यात आलेले होते.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये सदर कार्यमुक्त केलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञांना विविध कार्यक्रम तसेच जिल्हा रुग्णालय,ग्रामीण रुग्णालये,रक्त साठवणी केंद्र तसेच राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत समायोजित करणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत.करिता आपण आपल्या स्तरावरील प्रयोगशाळा तंत्रज्ञांची रिक्त पदांची माहिती या कार्यालयास तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन उपरोक्त प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे समायोजन करणे सुलभ होईल

जिल्हा शल्य चिकित्सक,
सर्वोपचार रुग्णालय,नागपूर

प्रति,
आरोग्य अधिकारी,
महानगर पालीका,
नागपुर

**प्रतिलिपी माहितीस सविनय सादर**
१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नागपुर
२) मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,नागपुर